# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## कृषि संशोधन केंद्र, अचलपूर

दुरध्वनी क्र. ०७२२३/२२०११ E-mail - arsachalpur@gmail.com

जा.क्र. कृसंके/अचल/प्रक्षेत्र / ५१८ /२०२६ दिनांक- २२ / ०१ /२०२६

### निविदा सुचना

प्रति,

.................................

.................................

.................................

**विषय - कृषि संशोधन केंद्र, अचलपूर येथील प्रक्षेत्रावरील पिकांमध्ये व फळबागेमध्ये निंदण करणे व अडाण काढणे इ. कामे प्रति एकर दराप्रमाणे बाहय पध्दतीने करण्याबाबत...**

कृषि संशोधन केंद्र, अचलपुर येथील विविध कामे प्रति एकर दर प्रमाणे बाहय पध्दतीने करण्याबाबत खालील नियम व अटी प्रमाणे निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्रक्षेत्रावरील कामाचा तपशिल | दर प्रति क्विंटल |
|---|---|---|
| १ | पिकातील व फळबागेतील अडाण ब्रश कटरने काढणे. | |
| २ | पिकातील व फळबागेतील निंदण करणे. | |
| ३ | पिकातील व फळबागेतील अडाण/गवत काढणे. | |

**निविदा पुरविण्याची अटी व शर्ती -**

१. निविदा सोबत दिलेल्या नमुन्यात मोहरबंद लिफाफयामध्ये दिनांक ३० / ०१ /२०२६ पर्यंत (सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) सादर करावीत.

२. लिफाफयाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात निविदा सुचना मध्ये नमुद केलेल्या विषय नमुद करावा तसेच दर पत्रकामध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्र क्र. कृसंके/अचल/प्रक्षेत्र/ ५१८ /२०२६ व दिनांक २२/१/ /२०२६ नमुद करावे.

३. काम करणा-या मजुरांच्या कायदेशिर दायित्वाची इत्यादीची जबाबदारी संबंधित निविदा धारकाची असेल कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरुन पडणे व शेतीस अनुसरुन इतर इजा इत्यादी बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही/स्विकारणार नाही.

४. काम अपुर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

५. समान दरपत्रके व दर आढळून आल्यास यापूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व याबाबतचे सर्व अधिकार हे निम्न स्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

६. बाहय पध्दतीने काम करणा-या मजुरांचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षापेक्षा जास्त असू नये.
७. कोणतीही निविदा पुर्णपणे अंशतः स्विकारणे किंवा आलेल्या सर्व दरपत्रके नाकारणे यांचे अधिकार हे निम्न स्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समिती यांचे असतील.
८. संबंधित दर हे संपूर्ण वर्षासाठी स्थापित असतील.
९. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयके अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित निविदा धारकास लागणारे देयके अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील तसेच काम करणा-याच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर राहणार नाही. त्याबाबत कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज या कार्यालय मार्फत मिळणार नाही. सदर कामाबाबत रु १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरीकडे करारनामा करुन देण्यात दयावा लागेल. रु. १००/- चा स्टॅम्प निविदा धारकास आणावा लागेल.
१०. दर पत्रके मंजुर करणे अथवा काम समाधानकारक न केल्यास सदर करार रद्द करणे याबाबतचे सर्व हक्क समितीने स्वतःकडे राखून ठेवले आहेत.
११. या प्रक्षेत्रावरील निविष्ठा व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.
१२. या दर प्रक्रीयेत अथवा कामाच्या बाबतीत न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अचलपूर न्यायालयात चालेल.
१३. संबंधित निविदा धारकांनी वरील नियम अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र सही, नाव व पुर्ण पत्त्यासह व मोबाईल नंबर सह दरपत्रक सोबत सादर करावेत.
१४. निविदा कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १० ते ५ पर्यंत स्विकारल्या जातील.
१५. शेती संबंधित काम असून भविष्यात या आस्थापनेवर रोजंदार म्हणून काम मिळणार नाही किंवा तसा दावा करता येणार नाही.
१६. प्रक्षेत्रावर काम करीत असताना सुरक्षितपणे व सावधतेने काम करावे लागेल. याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.
१७. कामाचा आदेश प्राप्त झाल्यापासून ३ दिवसात काम सुरू करावे लागेल.
१८. काम झाल्यानंतर उधारी देयक दोन प्रतिमध्ये देण्यात यावे.

प्रभारी अधिकारी,
कृषि संशोधन केंद्र, अचलपूर